ऑर्किड अभियांत्रिकीतर्फे गांडूळ खत निर्मितीवर कार्यशाळा

Siddheshwar nagari 06/08/2024

सोलापूर : वाढती लोकसंख्या व दैनंदिन जीवनातील आवश्यक बदलांमुळे घनकचरा मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे. या घन कचऱ्याचे व्यवस्थापन ही काळाची अत्यावश्यक बाब बनली आहे. काळाची ही गरज ओळखून तळे हिप्परगा येथील नागेश करजगी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्थापत्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी डॉ. श्रीकांत जहागीरदार यांच्या मार्गदर्शनाखाली जैविक घनकचऱ्यापासून गांडूळखत निर्मिती प्रकल्प या विषयावर अभ्यास करून तो प्रकल्प महाविद्यालयाच्या आवारात पूर्णत्वास आणला आहे.

तसेच स्थापत्य विभागाच्या विद्यार्थी चमूने डॉ. विनायक पतकी यांच्या मार्गदर्शनाखाली सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभा करून महाविद्यालयातील सांडपाणी बाया जाऊ न देता महाविद्यालयातील आवारातील झाडांना पाणी देण्याची सोय पूर्ण केली आहे.

गांडूळ खत निर्मिती या विषयावर कार्यशाळा मंगळवार दि. १३ ऑगस्ट २०२४ रोजी उळे गावात, उळे ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे.

तरी ग्रामस्थांनी व नागरिकांनी या कार्यशाळेत सहभागी होऊन याचा लाभ घ्यावा, सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी प्रा. श्रीकांत जहागीरदार (मो.नं. ९५२५२९२६७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे यांनी केले आहे.